# मतिमंद तरुणीवर अत्याचार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - घरात बेडवर झोपलेल्या मतीमंद मुलीवर एका 32 वर्षीय व्यक्तीने अत्याचार केल्याची घटना 20 ऑक्टोबर रोजी सकाळी 9.30 वाजता खल्लार पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पीडित मुलीच्या आईच्या (70 वर्ष) तक्रारीवरून खल्लार पोलिसांनी आरोपी विक्रम मणिराम दामले (32) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. खल्लार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असलेल्या फिर्यादीला 35 वर्षांची मुलगी आहे. तिची मुलगी मानसिक आजारी असल्याने ती तिची पूर्ण काळजी घेते. 20 ऑक्टोबर रोजी सकाळी तक्रारदार आई शौचाससाठी बाहेर गेली होती. दरम्यान, आरोपी विक्रम मणिराम दामले त्यांच्या घरात घुसला. त्याची आई घरी आली असता आरोपी विक्रम दामले तिच्या घरात दिसला. तो पीडितेजवळ झोपला होता. हे पाहून पीडितेच्या आईने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे घाबरलेल्या आरोपी विक्रमने तेथून पळ काढला. या घटनेनंतर पीडितेच्या आईने याप्रकरणी खल्लार पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी विक्रम मणिराम दामले याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# पक्षफोड्या, भांडणलाव्या, सेटींगबाज प्रविण तायडेंची उमेदवारी रद्द करा!

## अचलपूर मतदारसंघातील भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये आक्रोश ■ जिल्ह्यातील भाजप नेत्यांना दिला थेट बंडखोरीचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**


**अमरावती, (दि.21)** - अचलपूर विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार म्हणून प्रविण तायडे यांचे नाव घोषीत होताच, मतदारसंघातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड आक्रोश पहायला मिळाला. सोमवारी(दि.21) अचलपूर मतदारसंघातील भाजप पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेवून प्रविण तायडे यांच्यावर अनेक आरोप केले. ज्यामध्ये प्रविण तायडे पक्ष फोडतात, गटबाजी करतात, आपसात भांडण लावतात, वरिष्ठ नेत्यांपुढे स्वतऱ्ला प्रदर्शीत करण्याकरिता विविध सेटींग करतात. मतदारही त्यांना अजिबात पसंत करित नाहीत. त्यामूळे पक्ष श्रेष्ठींनी तातडीने त्यांची उमेदवारी रद्द करावी, अन्यथा भाजपमधील महत्वाचे पदाधिकारी बंडखोरी करत स्वतऱ उभे राहणार असल्याचा इशारा यावेळी दिला. पत्रकार परिषदेला भाजप उपजिल्हा अध्यक्ष मनोहर सुने, गोपाल तिरमारे, प्रमोदसिंग गड्रेल, सुधिर रसे, डॉ.राजेश उभाड, अभय माथने, अक्षरा लहाणे यांच्यासह अनेक महत्वाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाने रविवार (21 ऑक्टोबर) रोजी विधानसभा निवडणूकीतील उमेदवारांची आपली पहिली यादी जाहीर केली. ज्यामध्ये धामणगाव रेल्वे मतदारसंघातून विद्यमान आमदार प्रताप अडसड आणि अचलपूर मतदार संघातून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रविण तायडे यांना उमेदवारी दिली. परंतु प्रवीण तायडे यांना उमेदवारी घोषीत झाल्यानंतर अचलपूर मतदारसंघातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उद्रेक निर्माण झाला. समाजमाध्यमांवर प्रविण तायडेंच्या उमेदवारी विरोधात अनेकांनी पोस्ट केल्याचेही पहायला मिळाले. अचलपूर मतदारसंघातील भाजपमध्ये अस्थिरता निर्माण झाल्याने पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील भाजप बंडखोरी करत असल्याचा इशारा दिला. पत्रकार परिषदेला नंदकुमार वासनकर, मयुर खापरे, विलास दामेधर, प्रसन्न काठोळे, सुमित निंभोरकर, राजू तंतरपाळे, माधव अवघड यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



### प्रवीण पराजय पर्व

फेसबुक व इतर समाजमाध्यमांवर 'प्रवीण पराजय पर्व' नावाची पोस्ट तयार करुन व्हायरल केली जात आहे. या पोस्टमध्ये प्रविण तायडे यांना आपला तो आपलाच (निवडणुकीपुरता) पुढचे 30 दिवस फक्त भाजपासाठी, प्रविणभाऊंच्या पराभवासाठी, असे आवाहन करण्यात आले आहे.




### फक्त भाजप फोडण्याचे काम

प्रविण तायडे यांनी फक्त भाजप फोडण्याचे, अंतर्गत भांडणे लावण्याचे, गटबाजी करण्याचे काम पक्षात केले. मजबूत असलेल्या भाजपला कमजोर करण्याचा कटकारस्थान त्यांचे आहे. त्यामूळे आम्ही त्यांना विरोध करत आहो. हा प्रकार मी जिल्हाध्यक्षांनाही सांगितला, परंतू त्यांनी आतापर्यंत कोणताच निर्णय घेतलेला नाही.

**-गोपाल तिरमारे,**
**भाजप पदाधिकारी तथा माजी नगरसेवक,**
**चांदूर बाजार.**

### डमी उमेदवार दिल्याने मतदारसंघात नैराश्येचे वातावरण

गेल्या पाच ते सहा महिन्यापासून आम्ही मतदारसंघात फिरत होतो, भाजपसाठी सकारात्मक वातावरण होते. परंतू विधानसभा प्रमुख म्हणून जबाबदारी आल्यानंतर प्रविण तायडे यांनी मतदारसंघात स्वतऱ्लाच प्रदर्शित करणे सुरु केले. कोणत्याही भाजपच्या फ्लेक्सवर ते स्वतऱ्चा मोठा फोटो लावून इतरांचा लहान फोटो ठेवत होते, जेव्हा पक्षाअंतर्गत निवडणूक झाली, तेव्हा प्रविण तायडे यांनी पक्ष निरीक्षक खा. अनुप धोत्रे यांना दिलेल्या यादीमध्ये 50 टक्के भाजपेतर अनोळखी मतदार होती. ज्यामूळे त्यांना मते जास्त मिळाली. भाजपमधील अनेक महत्वाच्या लोकांची नावेच या यादीमधून बेपत्ता होती. हा सगळा प्रकार आम्ही भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रविण पोटे, डॉ.अनिल बोंडे, नवनित राणा यांना सांगितला. परंतू आमच्या तक्रारीची कोणतीही दखल यांनी घेतली नाही. आता तायडेंच्या रुपाने डमी उमेदवार दिल्याने भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांमध्ये प्रचंड नैराश्येचे वातावरण निर्माण झाले आहे. अजूनही वेळ गेली नाही, पक्षश्रेष्ठींनी निर्णय घेवून 11 इच्छुक उमेदवारांपैकी कोणत्याही एका व्यक्तीला उमेदवारी द्यावी, आम्ही सर्व एकदिलाने काम करु.

**डॉ.राजेश उभाड, जेष्ठ कार्यकर्ते, भाजप.**

### मतदारसंघाबाहेरील आयातीत उमेदवार

प्रविण तायडे हे काही वर्षांपुर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये होते. त्यानंतर ते भाजपमध्ये आले. त्यांचे गाव हे अचलपूर मतदारसंघामध्ये येत नाही. हे आयात केलेले उमेदवार आहेत, असे असताना त्यांना अचलपूर मतदारसंघामध्ये उमेदवारी देण्यात आली. आम्ही अनेक वर्षांपासून या मतदारसंघातील राजकारण अनुभवलेले आहे. प्रविण तायडेंसारख्या व्यक्तीला उमेदवारी देणे म्हणजे थेट विरोधी पक्षातील उमेदवारांना लाभ पोहोचविण्याचा प्रकार आहे.

**मनोहर सुने, उपजिल्हा अध्यक्ष( ग्रामीण ) भाजप.**

### संधी गमावणार नाही!

20 वर्षानंतर अचलपूर मतदारसंघ हा भाजपसाठी सुटलेला आहे. या ठिकाणी हिंदुना एकत्र करण्याकरिता आम्ही रक्ताचे पाणी केले आहे. आता कोठे भाजपकरिता मतदारसंघ काबीज करण्याची संधी असताना प्रविण तायडेंसारखा उमेदवार देवून ही संधी भाजप गमावित आहे. परंतू आम्ही तसे होवू देणार नाही. मी स्वतऱ, मनोहर सुने व सुधिर रसे असे तिघेजण अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करु. त्यानंतर एकदिलाने यापैकी कोणत्याही एका व्यक्तीला समर्थन देवून, त्यांना निवडूण आणू, शेवटी आम्हाला मतदारसंघात भाजप वाचवायची आहे. त्यामूळे कठोर निर्णय घेणे भाग आहे.

**प्रमोदसिंग गड्रेल, भाजप पदाधिकारी, अचलपूर.**

# आजपासून नामांकन अर्ज दाखल करण्याचे धूमशान

## विधानसभा निवडणुकीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

### अमरावती, बडनेरा मतदारसंघाची पाहणी

### सरमिसळनंतर मतदानयंत्र रवाना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )**- विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. उद्या मंगळवार, दि. 22 ऑक्टोबरपासून नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरूवात होणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कामाचा दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. तसेच सरमिसळ केल्यानंतर मतदानयंत्र संबंधित विधानसभा क्षेत्रात आजपासून पाठविण्यास सुरूवात करण्यात आली.



जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात दोन हजार 708 मतदान केंद्र राहणार आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या मतदानयंत्राच्या 25 टक्के अधिक मतदान यंत्र उपलब्ध झाले आहे. मतदान यंत्राची प्रथमस्तरीय तपासणी केली आहे. ही मतदान यंत्रे स्ट्राँगरूममध्ये सुरक्षितरित्या ठेवण्यात आले आहे. सरमिसळनंतर या मतदानयंत्रांचे विधानसभा मतदारसंघनिहाय वाटप आजपासून लोकशाही भवनातून सुरू करण्यात आले आहे. प्रत्येक मतदारसंघाला 20 टक्के अधिक मतदानयंत्र वाटप करण्यात आले आहे.

दरम्यान आज जिल्हाधिकारी कटियार यांनी यांनी अमरावती आणि बडनेरा मतदारसंघाच्या नामनिर्देशन पत्र स्विकारण्यात येत असलेल्या कार्यालयाची पाहणी केली. अमरावती मतदारसंघासाठी तालुका प्रशासकीय भवनात नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची पाहणी केली. नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी येणाऱ्यांना योग्य त्या सुविधा देण्यात याव्यात. खर्च आणि परवानग्यांची योग्य माहिती देण्यात यावी. उमेदवारांना अर्ज, नमूने आणि आवश्यक त्या सूचना एकाचवेळी देण्यात याव्यात. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ पाच व्यक्तींनाच प्रवेश देण्यात यावा. परिसरात अनावश्यक गर्दी होऊ नये, यासाठी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देशही कटियार यांनी दिले.

# अमरावतीमध्ये चारही देशमुखांना पुन्हा उमेदवारी?

## आज काँग्रेस पहिली यादी घोषीत होण्याची शक्यता









**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )**- काँग्रेसच्या उमेदवारांची पहिली यादी उद्या म्हणजेच 22 ऑक्टोबर रोजी जाहीर होण्याची शक्यता आहे. ज्यामध्ये अमरावतीमध्ये चारही देशमुखांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळण्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

तिवसा मतदारसंघातून विद्यमान आमदार ॲड.यशोमती ठाकुर(देशमुख), धामणगाव रेल्वे मतदार संघातून माजी आमदार विरेंद्र जगताप (देशमुख), अमरावती मतदारसंघातून सुनिल देशमुख तर अचलपूर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना उमेदवारी देण्यात येणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. 20 ऑक्टोबर रोजी भाजपाने आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. भाजपाच्या पहिल्या यादीत एकूण 99 नावे आहेत. त्यानंतर आता काँग्रेसच्या गोटातून जागावाटपा संदर्भात मोठी माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार काँग्रेसमध्ये एकूण 54 उमेदवारांची नावे निश्चित झाली आहेत. आ.यशोमती ठाकुर यांना पाचव्यांदा, सुनिल देशमुख यांना तिसऱ्यांदा, विरेंद्र जगताप यांना पाचव्यांदा तर बबलू देशमुख यांना तिसऱ्यांदा काँग्रेसची उमेदवारी मिळणार आहे.

# नांदगाव पेठमध्ये साडे तीन लाखांची चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** -शासकीय वसाहत स्थित एका अंगणवाडी सेविकेच्या घरी अज्ञात चोरांनी प्रवेश करून, साडे तीन लाख रुपये किमंतीचे सोन्याचे दागिन्यांसह 50 हजारांची रोखड सुद्धा लंपास केली. ही घटना 20 ऑक्टोबर रोजी रात्री उघडकीस आली. श्रमिका जानराव मानकर रा शासकीय वसाहत नांदगाव पेठ यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी घटनेची नोंद केली असून तात्काळ श्वानपथकाला पाचारण करून तपासला गती देण्यात आली. घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. श्रमिका व तिची आई रत्ना या दोघीही विचोरी ता. मोर्शी येथे अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहे.

# ऑटोला पिकअपची धडक; भजनी मंडळ जखमी

### वरुड परिसरातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड( दि.21 )**- बेनोडा शहीद येथील भजनी मंडळाच्या ऑटोला भरधाव पिकअप वाहनाने धडक दिल्याने 8 जण गंभीर जखमी झाले. ही घटना रविवारी रात्री 11 वाजताच्या दरम्यान रिलायन्स पेट्रोल पंप समोर घडली.

येथील भजन मंडळाचा सुंदर कांड या कार्यक्रमाचे आयोजन वरूड येथे करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाकरिता रविवार (तारिख 20) दुपारच्या सुमारास भजनी मंडळी बेनोड्यातुन एका प्रवासी ऑटोरिक्षाने वरूडात पोहचली. रात्री 11 वाजताच्या सुमारास संपूर्ण कार्यक्रम आटपून हे भजन मंडळ बेनोडा जाण्यासाठी निघाले. तेव्हा रेस्ट हाऊस कडुन बसस्थानकाकडे जाणाऱ्या पिकअपने त्यांच्या ऑटोरिक्षाला जबर धडक दिली. विशेष बाब म्हणजे या रस्त्याचे एका बाजुचे काम सुरू असल्याने दोन्ही वाहने रस्त्याच्या दुसर्या एकाच बाजूने जात होते. तेव्हा हा प्रवाशी ऑटोरिक्षा दुभाजकाच्या बाजुने जात असताना समोरून भरधाव येणाऱ्या पिकअप ऑटोरिक्षावर जाऊन धडकला असल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात ऑटोरिक्षाचा चुराडा झाला असून, यातील एकूण आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तत्काळ उपस्थित नागरिकांच्या मदतीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना नागपुर येथे रवाना करण्यात आले आहे. या अपघातातील गंभीर जखमींमध्ये बेनोडा येथील प्रल्हाद बिडकर (58), प्रदिप हिरूळकर (55), अरविंद चौबे (65), अरविंद पंचभाई (56), मनोज बोंदरे (40), निखिल चोरे (24), ऑटोरिक्षा चालक शेख आरिफ शेख पठाण (44), व जरूड येथील प्रल्हाद वाडबुदे (60) यांचा समावेश आहे. प्राप्त माहितीनुसार या अपघातातील तिघेजण चोरे, पंचभाई व बोंदरे यांना जबर मार लागल्याचे कळते. तर काहींचे पाय निकामी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले व अपघातग्रस्त दोन्ही वाहने जप्त करण्यात आली. पिकअप चालक मात्र घटनास्थळा वरून पसार झाला आहे. अद्यापपर्यंत या प्रकरणी कोणीही फिर्याद दाखल केली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.






**अमरावती**- संत तुकडोजी महाराज यांनी समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी, तसेच जातीभेद दूर व्हावेत यासाठी आपले काव्य, अभंग, कीर्तन आणि विचारांद्वारे प्रयत्न केले. महाराजांनी सर्वधर्मसमाभावाचाही सतत पुरस्कार केला. अशा या थोर संताच्या पुण्यतिथीनिमीत्त त्यांना मौन श्रध्दांजली देण्याकरिता गुरुदेव भक्तांचा असा जनसागर उसळला होता.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# निवडणूक : जिल्हा प्रशासनाने या गोष्टींवर लावले निर्बंध

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** - जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आदर्श आचारसंहिता कालावधीत अनेक गोष्टींवर जिल्हा प्रशासनाकडून 23 नोव्हेंबरपर्यंत निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी कटियार यांनी दिले आहेत.

**ध्वनिक्षेपकाच्या वापरावर निर्बंध**

निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या वाहनावरील ध्वनीक्षेपकामुळे ध्वनीप्रदूषण होते. परिणामी सामान्य नागरिकांच्या जीवनातील शांतता व स्वास्थ्यास बाधा पोहोचण्याची शक्यता असते. त्यामुळे भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 नुसार निवडणूक आयोगाने प्रतिबंध आणले आहेत. व्यक्ती, संस्था, पक्ष कार्यकर्ते यांना ध्वनीक्षेपकाचा (लाऊडस्पिकरचा वापर) सक्षम पोलीस अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. फिरते वाहन रस्त्यावरुन धावत असताना त्यावरील ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. निवडणूक कालावधीत ध्वनीक्षेपकाचा वापर सकाळी 6 ते रात्री 10 वाजेनंतर करता येणार नाही.




**सभा, मिरवणूकींवर निर्बंध**

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा तसेच सभा घेण्यास निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी सौरभ कटियार यांनी निर्गमित केले आहेत. हे आदेश 23 नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहणार आहेत. जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणुकीसंदर्भातील पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्स लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, आवारात निवडणूकविषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे तसेच निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल, अशी कृती करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे.



**शस्त्र वाहून नेण्यास प्रतिबंध**

जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व मुक्त, न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसील कार्यालय तसेच निवडणूक कालावधी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अन्वये अमरावती जिल्ह्यामध्ये सर्वत्र शस्त्र वापरावर निर्बंध जाहीर आले आहेत. यानुसार निवडणूक कार्यक्रम झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शस्त्र परवानाधारकास शस्त्र वाहून नेण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 सुधारणा कायदा भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत 23 नोव्हेंबरपर्यंत निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी कटियार यांनी दिले आहेत.

**सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करण्यास निर्बंध**

सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष विद्रुपीकरण करण्यास निर्बंध घालण्याचे आदेश दिले आहेत. शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी निर्बंध घालण्याचे आदेश दिले आहेत.

**धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्थांच्याजवळ बुथवर नको**

जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्थांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्थांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजे दि. 23 नोव्हेंबर, 2024 पर्यंत निर्बंध घातल्याचे आदेश दिले आहेत.

## नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे या बाबीवर निर्बंध घालणे आवश्यक आहे.

## मोटार गाड्या ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध

कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी तीन पेक्षा अधिक मोटार गाड्या, वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.

## शिबिरांच्या आयोजनास निर्बंध

निवडणूक कालावधीमध्ये कसल्याही प्रकारचे जात, भाषा, धर्म, भाषावाद शिबिरांचे आयोजनावर निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हा दंडाधिकारी सौरभ कटियार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये दिले आहेत.

# मोर्शी विधानसभा मतदारसंघात 290339 मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**311 मतदान केंद्रांवर 1494 कर्मचाऱ्यांची व्यवस्था**

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.21 )**- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची घोषणा भारत निवडणूक आयोगातर्फे करण्यात आलेली असून मोर्शी विधानसभा मतदारसंघांमध्ये मोर्शी व वरुड तालुक्यातील शहरी व ग्रामीण मिळून एकूण 311 मतदान केंद्रावर दिनांक 20 नोव्हेंबर 2024 ला मतदान होणार आहे. त्यासाठी 1494 कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारसंघांमध्ये 148557 पुरुष व 141782 महिला अशी एकूण 290339 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. अशी माहिती मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा मोर्शी चे उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार यांनी दिली.



निवडणूक आयोगाचे वतीने त्यांनी सांगितले की आयोग निवडणुकीसाठी सज्ज असून मतदार संघामध्ये 81 शहरी व 230 ग्रामीण असे एकूण 311 मतदान केंद्रे राहतील. मतदान केंद्रावर मोर्शी मतदारसंघा बाहेरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांना तीन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. दिनांक 19 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान पथके मतदान केंद्राकरिता रवाना होणार आहेत. मतदान पथकांना मतदान केंद्रावर जाण्याकरिता मतदान आटोपल्या नंतर साहित्य संकलन केंद्रावर आणण्याकरिता महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ महामंडळाच्या 33 बसेस 29 खाजगी लहान वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. 1852 दिव्यांग 85 वर्षांवरील 4585 वयोवृद्ध मतदारांचे मतदान त्यांनी तशी मागणी केल्यास मतदान अधिकारी त्यांचे घरी जाऊन घेणार आहेत. तशी व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान मतमोजणी दिनांक 23 नोव्हेंबर 2024 रोजी मोर्शी येथील शासकीय धान्य गोदामाच्या इमारत क्रमांक दोन मध्ये होईल. आचारसंहितेच्या पालनाकरिता 3 एसएसटी, 5 एफएसटी, 5 व्हीएसटी आणि 1 व्हीव्हीटी असे एकूण 14 पथके कार्यान्वित करण्यात आलेली असून आंतरराज्य सीमेवर तपासणीसह सभास्थळ व इतर ठिकाणी होणाऱ्या प्रचार सभांवर व्हिडिओ कॅमेऱ्यांच्या माध्यमातून कर्मचारी अधिकारी लक्ष देणार आहेत. मोर्शी तालुक्यातील सायवाडा तसेच वरुड तालुक्यातील उराड आणि रवाळा येथे आंतरराज्य सीमेवर एसएसटी पथका मार्फत नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

# अल्पवयीन तरूणाचा चाकुन भोसकून खून

**झुडूपात फेकला मृतदेह**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 21 )** - खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गडगडेश्वर मंदिरामागील परिसरात एका अल्पवयीन तरुणाची निर्घुण हत्या करण्यात आली. साहिल मनीष पंजाबी उर्फ चोपडा (17, रा. अंबा कॉलनी, रविनगरजवळ, अमरावती) असे मृताचे नाव असल्याची माहिती खोलापुरी गेट पोलिसांनी दिली. सोमवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

साहिलचा मृतदेह गडगडेश्वर परिसरातील मंदिरामागे रक्तबंबाळ अवस्थेत पडून आहे, तर बाजुला एक रक्ताने माखलेला चाकू पडून असल्याची माहिती एका स्थानिकाने खोलापुरी गेट पोलिसांना दिली. त्याआधारे पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. तथा चाकुदेखील जप्त केला.





पोलिसांनुसार, साहिलच्या अंगावर धारदार शस्त्राचे वार असून, अज्ञात आरोपींनी त्याच्यावर वार करून त्याचा मृतदेह गडगडेश्वर मंदिराच्या मागील बाजुच्या झुडूपात फेकून दिल्याची प्राथमिक माहिती आहे. साहिलला वडिल नसून, त्याने याचवर्षी दहावी उत्तीर्ण केली होती, अशी माहिती जिल्हा सामान्य रूग्णालयात एकत्र आलेल्या त्याच्या समवयस्कांनी दिली. पोलीस प्रशासन अद्यापपर्यंत घटनास्थळीच असून, याप्रकरणी उशिरा रात्री खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, साहिलचा खून हा पुर्ववैमनस्यातून झाला असावा, ही शक्यता लक्षात घेता खोलापुरी गेट पोलिसांसह गुन्हे शाखा, सीआययु पथकाने आरोपींची शोधमोहिम चालविली आहे. 6 ऑक्टोबरपासूनची ही हत्येची सातवी घटना ठरली आहे. पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भंवर यांच्यासह क्राईमच्या तीनही टिम घटनास्थळी आहेत.

# दोन गांजा तस्कर जेरबंद

**28.350 किलोचा गांजा जप्त**

**गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 ची बडनेरात कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 21 )** गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पोलिस अधिकारी आणि कर्मचार्यांनी बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गांधी विद्यालयाजवळ दोन गांजा तस्करांना अटक केली. मोहम्मद अवेस वल्द मोहम्मद आरीफ (22, रा. टेकडीपुरा, वार्ड नं. 6, मंगरूळपीर, जि वाशीम, ह.मु. खदान नाका, मुलानी चौक, अकोला) व इमरान खान वल्द नवाज खान (30, रा. लालखडी, वाटर सप्लायजवळ, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून जवळील 5 लाख 74 हजार 200 रुपये किमंतीचा 28.350 किलो ग्रॅम वजनाचा गांजा व इतर साहित्य असा एकुण 5 लाख 74 हजार 200 रूपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना बडनेरा पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, त्यांच्याविरुध्द एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



पोलीस आयुक्त यांच्या आदेशानुसार, विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलिस शहरातील सराईत गुन्हेगांवर प्रतिबंध कार्यवाही व्हावी. तसेच अंमली पदार्थ विक्री व वाहतुक करणार्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करण्यासाठी 20 ऑक्टोबर रोजी पेट्रोलींग करीत होते. दरम्यान गुप्त माहिती मिळाली की, दोन इसम हे बडनेरा रेल्वे स्टेशनकडुन गांधी विद्यालय रोडने गांजा विक्री करण्याकरीता चार बॅग घेवुन जात आहे. या माहीतीवरून गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने सापळा रचुन त्या दोन इसमांना ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांनी मोहम्मद अवेस वल्द मोहम्मद आरीफ व इमरान खान वल्द नवाज खान असे नावे सांगितले. पोलिसांनी त्याच्याजवळील बॅगची तपासणी केली असता, त्यात गांजाचा माल आढळून आला. त्यानंतर त्यांना बडनेरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार, यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगाले, योगेश इंगळे, पोलिस उपनिरीक्षक संजय वानखडे, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, गजानन ठेवले, आस्तीक देशमुख, अजय मिश्रा, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, नईम बेग, चेतन कराडे, राजीक रायलीवाले, योगेश पवार, निलेश वंजारी, सागर ठाकरे, संदीप खंडारे यांनी केली आहे.

## शिलोडा गावात वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**नांदगाव खंडेश्वर** - शिलोडा गावात 19 ऑक्टोंबर रोजी सायंकाळी 4 ते 7 वाजतादरम्यान विज पडून एकाचा मृत्यू झाल्याची घटना पुढे आली आहे. संतोष माणिकआप्पा सवटे (40) असे मृताचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## गरीब शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार कल्याणासाठी रिंगणात - विपुल भडांगे



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.21 )** - नुकतीच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागलेली आहे वरुड मोर्शी मतदार संघातील शेतकरी शेतमजूर सुशिक्षित बेरोजगार व गोरगरिबांच्या कल्याणासाठी अपक्ष निवडणूक लढविणार असल्याचे मोर्शी येथील विपुल भडांगे यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

ते पुढे म्हणाले की मी सन 2016 मध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोर्शी नगरपालिकेची निवडणूक लढविली केवळ चार मताने माझा पराभव झाला, तेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्या नाही, आता थेट विधानसभेची निवडणूक अपक्ष लढवणार असल्याचे विपुल भडांगे म्हणाले. आज पर्यंत वरुड मोर्शी चा इतिहास बघितला तर केवळ आणि केवळ वरुड तालुक्यातीलच आमदार झाले मोर्शी तालुक्याला अद्याप पर्यंत प्रतिनिधित्व करण्याचा अवसर मिळाला नाही एक वेळा तरी माझ्या रूपाने मोर्शी तालुक्याला आमदार म्हणून मिळावा यासाठी मी ही निवडणूक लढवीत आहे. एवढेच नाही तर प्रत्येक क्षेत्रामध्ये सर्वसामान्य नागरिकांवर होणारा अन्याय दूर व्हावा यासाठी माझी उमेदवारी राहील मी मागील काही दिवसा अगोदर मोर्शी नगरपालिकेमध्ये एक कोटी 80 लाख रुपये पाणीपट्टी कर नगरपालिकेने थकविल्यामुळे नागरिकांचा पाणीपुरवठा बंद होता. यामध्ये कोणताही आजी-माजी आमदाराने पुढाकार घेऊन मोर्शी शहराचा पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुद्धा केले नाही मी स्वत: जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना फोन करून पाणीपुरवठा विभागाची बैठक घेऊन ताबडतोब पाणीपुरवठा सुरू केला. हे आमदाराला सुद्धा करता आले असते, परंतु त्यांची मानसिकता नसल्यामुळे ते करू शकले नाही असा आरोपही भडांगे यांनी केला आहे. या पत्रकार परिषदेला अण्णासाहेब भोंगाडे विपुल भडांगे सह मोर्शी तालुक्यातील कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# पोलिस आयुक्तालयात पोलिस स्मृतीदिन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 21 )**- ऑक्टोबर 1959 रोजी लडाख येथे चिनच्या सैनिकासोबत लढतांना केद्रीय राखीव पोलीस दलाच्या 10 जवानांनी प्राणांची आहुती दिली होती. या अनुषंगाने कर्तृयव्यावर असतांना बलीदान दिलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या स्मरणार्थ दरवर्षी 21 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय पोलीस स्मृतीदीन साजरा केला जातो. त्यानुसार पोलीस स्मृतीदिना निर्मित्य अमरावती शहर पोलीस आयुक्तालयच्या वतीने पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर पोलिस स्मृती दिन साजरा करण्यात आला.

देशाचे रक्षणाकरीता प्राणांची आहुती देणार्या पोलीस अधिकारी व कर्मचारीयांचे शहीद पोलीस स्मृती स्तंभास पुष्पचक अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी विभागीय आयुक्त निधी पांडेय उपस्थित होत्या. 1 सप्टेबर 2023 ते 31 ऑगस्ट 2024 या कालावधीमध्ये कर्तव्यार्थ असतांना दिवंगत झालेल्या 216 पोलीस अधिकारी, जवानांचे नांवाचे वाचन करून पोलीस मुख्यालय शहर, ग्रामिण व राज्य राखीव पोलिस बल गट क्रमांक 9 येथील पोलीस प्लॉटुन व पोलीस बॅन्ड पथक यांनी पोलीस स्मृतीस्तंभास सलामी दिली व तीन फेरी निकामी राउन्ड फायर करून मानवंदना देण्यात आली. पोलीस स्मृतीदिन अभिवंदनास पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, मनपा आयुक्त सचिन कलत्रे, पोलीस अधिक्षक विशाल आनंद, राज्य राखीव पोलिस बल गट क्रमांक 9 येथील समादेशक राकेश कलासागर, समादेशक सुशांत सिंग, पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील, पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरीक व शांतता समिती सदस्य उपस्थित होते. हुतात्मा परेडचे नेतृत्व राखीव पोलीस निरीक्षक श्रीधर गुळसुंदरे यांनी केले. कार्यकमाचे संचलन पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राम्हणे यांनी केले. शहीदांचे नावांचे वाचन सहायक पोलिस आयुक्त अरुण पाटील व ग्रामिणचे परीविक्षाधिन पोलिस उपायुक्त शिवम विसापुरे केले.





